# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय**:- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या 36 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-1/ल.ले/ 196 /सन 2025-26

फोर्ट, मुंबई 400001 दिनांक: 12/12/2025.

**प्रति,**

01. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
02. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
03. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
04. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
05. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईंदर / वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल / भिवंडी-निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
06. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
07. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
08. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
09. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
10. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
11. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (SRA)
12. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
13. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
14. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
15. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
16. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
17. विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग-उत्तर कोकण / दक्षिण कोकण
18. सहाय्यक वनसंरक्षक कांदळवन विभाग-उत्तर कोकण / दक्षिण कोकण
19. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
20. श्रीमती. हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रुप.
21. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
22. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
23. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
24. उप मीठ आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई (विशेष निमंत्रित)
25. अध्यक्ष, महाप्रित (विशेष निमंत्रित)

**संदर्भ** :- या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-1/ल.ले/177/सन 2025-26 दि. 21/11/2025.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 36 **वी** बैठक **मंगळवार, दि.** 02/12/2025 रोजी **मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

**(मधुमिथा एस.)**
**सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

# ३६ वी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीची
# मंगळवार, दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**स्थळ :- जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय, फोर्ट, मुंबई.**

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३६ वी बैठक आयोजित करण्यात आली. समितीचे सदस्य सचिव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व माननीय अध्यक्ष यांच्या अनुमतीने विषयसुचीनुसार बैठकीस प्रारंभ करण्यात आला.

सदर बैठकीस खाली नमूद अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित होते तसेच काही अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभागी झाले.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. विजय सुर्यवंशी, भा.प्र.से. | मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| 2. | श्री. एस. व्ही. रामाराव, भा.व.से. | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक | कांदळन कक्ष, मुंबई |
| 3. | श्रीमती आंचल गोयल, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी, मुंबई शहर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 4. | श्रीमती मधुमिथा एस. भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 5. | श्रीमती कांचन पवार | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग-दक्षिण कोकण अलिबाग |
| 6. | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग-उत्तर कोकण |
| 7. | श्री. प्रदीप रा. तावरे | सहा.अधीक्षक, क्र. 1 | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 8. | श्रीमती विभावरी तुरकाने | सहयोगी नियोजनकार, सिडको | सिडको, सी. बी. डी. बेलापूर |
| 9. | श्री. विक्रम र. कदम | सहायक पोलीस आयुक्त | खारघर विभाग |
| 10. | आदिनाथ बुधवंत | सहायक पोलीस आयुक्त | वाशी विभाग |
| 11. | श्री. बासिन अली सय्यद | सहायक पोलीस आयुक्त | मुंबई |
| 12. | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी | ठाणे महानगर पालिका |
| 13. | श्री. अनिल पंडीत | Project Executive | Bombay Environmental Action Group |
| 14. | श्री. भारत शिवाजी ठेबरे | पोलीस उप निरीक्षक | पोलीस आयुक्त, ठाणे |
| 15. | श्री. जैसवाल आर. व्ही. | उप अभियंता | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 16. | श्री. गणेश डी. जाधव | Deputy Superintendent Salt | Salt Commissioner, Mumbai |
| 17. | श्री. पंडीत तावरे | Assistant Superintendent Mumbai City | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 18. | श्री. संजय शिंदे | DMC, Zone-I | NMMC |
| 19. | श्री. बलीराम जाधव | AE (Env.) City Engineer Department | NMMC Env. Department |
| 20. | श्री. जयेश वायकोळे | उप अभियंता पर्यावरण | महाप्रीत |

| | | | |
|---|---|---|---|
| 21. | श्री. आनंद जगताप | सोशल इम्पॅक्ट ॲडवाइझर | ERAF |
| 22. | श्रीमती दिप्ती इंदूलकर | Geo information Services (GIS analysis) | Geo info Service |
| 23. | श्री. राहूल देशमुख | ERAF & MAHAPREET | Geo info Service |
| 24. | श्री. आवेश मुकादम | ERAF & GC – Project Coordinator | ERAF-MAHAPREET –Geo Info |
| 25. | श्रीमती विद्या सावंत | उप अभियंता अधिकारी, TMC | TMC |
| **व्ही. सी.द्वारे उपस्थित अधिकारी / कर्मचारी** | | | |
| 1. | Additional Commissioner Revenu | - | - |
| 2 | AE SEM P/N Sunil Panas | - | - |
| 3 | BS Venkat | - | - |
| 4 | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे | - | - |
| 5. | जिल्हाधिकारी रायगड | - | - |
| 6. | श्रीमती इंदूराणी जाखड | - | जिल्हाधिकारी पालघर |
| 7. | जिल्हाधिकारी मुंबई शहर | - | - |
| 8. | जिल्हाधिकारी ठाणे | - | - |
| 9. | जिल्हाधिकारी रत्नागिरी | - | - |
| 11. | Jamsu Valvi | - | - |
| 12. | Member Secretary SEA | - | - |
| 13. | NIC Sindhudurg | - | - |
| 14. | Pl. PC & IT Thane Rural | - | - |
| 15. | Pl. Security Palghar | -- | - |
| 16. | Plashwini Patil | - | - |
| 17. | Rajesh Sonone | - | - |
| 18. | Satish Bagal | - | - |
| 19. | Sdo Alibag | - | - |
| 20. | SDO Panvel | - | - |
| 21. | Shekhar Ghadge | - | - |
| 22. | SP Raigad | - | - |
| 23. | SP Ratnagiri | - | - |
| 24. | Stalin D. | अशासकीय सदस्य | Vanshkti |
| 25. | Sub Division Roha | - | - |
| 26. | Tahasildar Malvan | - | - |
| 27. | Tahasildar Tal | - | - |

**टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्यामुळे वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.**

| अ.क्र | मुद्दा व विषय | झालेली चर्चा घेण्यात आलेला निर्णय/ सूचना | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | • कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत समितीचे सदस्य सचिव यांनी खाली दिलेल्या तक्त्यानुसार जिल्हा निहाय क्षेत्र हस्तांतरणासंदर्भात शिल्लक असलेल्या क्षेत्राची माहिती दिली.<br>• त्यानुसार मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्र वगळून शिल्लक असलेले एकूण 9765.19 हे. इतर शासकीय जमीनीवरील कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाबाबत काटेकोरपणे पालन करुन मा. उच्च न्यायालयाच्या दि.16 डिसेंबर 2025 रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीचे गांभीर्य विचारात घेऊन प्राधान्याने हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.<br>• जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या क्षेत्रातील काही कांदळवन जमीन भाडेपट्टयावर देण्यात आल्याबाबत समितीकडे मार्गदर्शन मागितले, यावर समितीचे सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी सदरची जमीन 2005 नंतर वाटप झाली असल्यास मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आहेत किंवा कसे याची खात्री करण्यास सांगितले. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 2005 मध्ये असलेले शासकीय जमीनीवरील कांदळवन क्षेत्र हे संरक्षीत वन म्हणून घोषित करण्याचे आदेश असल्याने त्यानुसार हस्तांतरणाची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, यांनी कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्याकरीता सदर जागेची महसूल विभाग, वन विभाग व संबंधित विभागाकडून संयुक्त स्थळ पाहणी करुन जेवढे क्षेत्र हस्तांतरीत करण्यास योग्य आढळत आहे तितके क्षेत्र हस्तांतरीत करण्याच्या व उर्वरीत हस्तांतरीत करणे का शक्य नाही याबाबत मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून तद्नंतर मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी अशा सूचना सर्व जिल्हाधिकारी यांना दिल्या. | सर्व संबंधित जिल्हाधिकारी महानगरपालिक, इतर शासकीय यंत्रणा व कांदळवन कक्ष, मुंबई. |

| अ. क्र. | जिल्हा | वन विभागाला हस्तांतरित झालेले एकूण कांदळवन क्षेत्र (हे.) | दि. 13.10.2023 रोजीच्या प्रतिज्ञापत्रकानुसार अजूनही वन विभागाला हस्तांतरित न झालेले क्षेत्र (हे.) | MRSAC 2005 व IIST 2018 यांचेकडील कांदळवन दर्शक नकाशानुसार व जागेच्या सद्यस्थितीनुसार नव्याने हस्तांतर करण्याकरीता शिल्लक असलेले क्षेत्र (हे.) | वन विभागाला हस्तांतरित करण्यासाठी शिल्लक असलेले कांदळवन क्षेत्र एकूण एकंदर (रकाना 5+6) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | मुंबई शहर | 253.00 | 23.65 | 44.85 | 68.50 |
| 2 | मुंबई उपनगर | 4067.50 | 0.00 | 275.13 | 275.13 |
| 3 | ठाणे | 3564.99 | 2.21 | 445.03 | 447.24 |
| 4 | पालघर | 4064.05 | 41.54 | 4670.89 | 4712.43 |
| 5 | रत्नागिरी | 2898.95 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 6 | सिंधुदुर्ग | 431.81 | 0.00 | 157.78 | 157.78 |
| 7 | रायगड | 10559.59 | 70.33 | 4033.78 | 4104.11 |
| | एकूण | 25839.89 | 137.73 | 9627.46 | 9765.19 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | कांदळवन क्षेत्र भारतीय वन अधिनियम, 1927 अंतर्गत कलम 4 अन्वये जाहीर तसेच कलम 20 अन्वये राखीव वन म्हणून अधिसूचित करण्यासाठी प्रलंबित असलेल्या क्षेत्राचा आढावा. | • मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांचे जिल्हा स्तरीय कांदळवन समितीमध्ये संबंधित विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग यांचे सोबत या संदर्भात आढावा घेऊन कांदळवन क्षेत्र भारतीय वन अधिनियम, 1927 अंतर्गत कलम 4 अन्वये जाहीर तसेच कलम 20 अन्वये "राखीव वन" म्हणून अधिसूचित करण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच महसूल व इतर शासकीय यंत्रणेच्या ताब्यात असलेले कांदळवन क्षेत्र भारतीय वन अधिनियम, 1927 चे कलम 4 करण्याकरीता प्रलंबित असले तरी देखील सदर क्षेत्र हस्तांतरणाची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. | सर्व जिल्हाधिकारी व संबंधित विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग |
| 3 | जिल्हास्तरीय समितींच्या बैठकीबाबत/ इतिवृत्तांबाबतचा आढावा. | • मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्हा व तालुका स्तरीय कांदळवन समितीच्या नियमीत बैठका घेऊन त्यांचे इतिवृत्त सदस्य सचिवांकडे पाठविण्याच्या सूचना दिल्या.<br>• यावर संचालक, वनशक्ती श्री. स्टॅलिन डी. यांनी जिल्हा व तालुका स्तरीय समितीचे इतिवृत्त सर्व समिती सदस्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत सांगितले. | सर्व संबंधित जिल्हाधिकारी, विभागीय वन अधिकारी व सहायक वनसंरक्षक, कांदळवन विभाग, उत्तर कोकण व दक्षिण कोकण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • त्या अनुषंगाने मा. अध्यक्षांनी सदरचे इतिवृत्त प्राप्त झाल्यावर समितीच्या सर्व सदस्यांना ईमेलद्वारे पाठविण्याच्या सूचना सदस्य सचिवांना दिल्या. | |
| 4 | समितीकडील जुन्या जिल्हा निहाय एकुण 45 प्रलंबित ऑफलाईन तक्रारीबाबत आढावा. | • समितीचे सदस्य सचिवयांनी कांदळवन समितीच्या ऑफ लाईन 45 तक्रारींपैकी 40 तक्रारींचे अहवाल प्राप्त झाले असून काही तक्रारी ज्या तक्रारींवर उचित कार्यवाही झाली आहे, अशा 9 तक्रारी निकाली काढण्यासाठी योग्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर चर्चा होऊन मा. अध्यक्ष व इतर समितीचे सदस्यांसोबत सविस्तर झालेल्या चर्चेनुसार सदर 9 तक्रारी (मुंबई उपनगर 3 - तक्रार क्रमांक 236,259 व 291, ठाणे 1- 309, पालघर 4- तक्रार क्रमांक -249,270,272,283 व रायगड 1- तक्रार क्रमांक 149) या निकाली काढण्याचे निर्देश दिले व संबंधित जिल्हाधिकारी यांना सदर जागेचे संबंधित विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग यांच्याशी समन्वय साधून जागेवर कांदळवनाची रोपवन करण्याकरीता उचित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.<br>• उर्वरित प्रलंबित तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीबावत स्पष्टता दिसून येत नसल्याने सर्व जिल्हाधिकारी यांना तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात सदस्य सचिवांकडे सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या.<br>• जिल्हाधिकारी रायगड यांनी "रायगड जिल्ह्यातील किनारी भागात खाऱ्या पाण्यामुळे नैसर्गिकरित्या वाढणारे कांदळवन पर्यावरणदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असल्याने त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. मात्र त्याच वेळेस या जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर परिणाम होऊ नये, हा प्रश्न उद्भवत आहे असे सांगितले.<br>• यावर संचालक, वनशक्ती श्री.स्टॅलिन यांनी "ज्या शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनी CRZ क्षेत्रात येतात आणि ज्यावर कांदळवन आहे, त्यांनी सदर ठिकाणी असलेल्या कांदळवनाची तोड, हानी होणार नाही याची दक्षता घेण्याच्या व शेतकऱ्यांच्या उपजिविकेच्या दृष्टीने शेती करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसारच पुढील कार्यवाही करण्याबाबत सांगितले.<br>• त्या अनुषंगाने, मा. अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना अशा जमिनींबाबतची सध्यस्थिती दर्शविणारा अहवाल तयार | सर्व जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्याचे निर्देश दिले असून, दिनांक 16.12.2025 रोजी मा. उच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीदरम्यान सदर बाब निदर्शनास आणून, न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | |
| 5 | Mangorve Suraksha App वरील प्राप्त तक्रारींच्या स्थळपाहणीसाठी तारीख व स्थळपाहणी अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित प्रारुपात अॅपवर अपलोड करणेबाबत आढावा. | • मा. अध्यक्ष यांनी जिल्हा निहाय कांदळवन तक्रारींबाबत आढावा घेतला व सर्व जिल्हाधिकारी यांना तात्काळ त्यांचे कार्यक्षेत्रातील Mangorve Suraksha App वरील तक्रारींवर नियमोचित कार्यवाही करुन तक्रारींचा निपटारा करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी वन विभागाच्या ताब्यात असलेल्या कांदळवन तक्रारींबाबत, तक्रार प्राप्त झाल्यावर जागेच्या स्थळ पाहणीकरीता महसूल विभाग व वन विभाग यांच्या संयुक्त पाहणीची प्रतीक्षा न करता, संबंधित स्थळाची पाहणी वन विभागामार्फत करून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सांगितले.<br>• यावर समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी वन विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या कांदळवन क्षेत्रांच्या स्थळपाहणीसंदर्भात विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग, उत्तर व दक्षिण कोकण यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांचे संबंधित उप विभागीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी, उत्तर कोकण व दक्षिण कोकण कांदळवन विभाग |
| 6 | कांदळवन क्षेत्रामधील डेब्रिज / भराव हटविण्याबाबत आढावा. | • महाप्रित यांचेमार्फत कांदळवन क्षेत्रामधील डेब्रिज / भराव हटविण्याकरीता केलेल्या कार्यवाहीबाबत PPT चे सादरीकरण करण्यात आले. (प्रत संलग्न) त्यामध्ये दिलेल्या माहितीनुसार मुंबई महानगरीय क्षेत्र (MMR) ठाणे, पालघर व रायगड या जिल्हयातील केलेल्या विश्लेषणानुसार त्यांचे कार्यक्षेत्रातील कांदळवनावर झालेल्या अतिक्रमण व डेब्रिज भरावाबाबत व करावयाच्या कार्यवाहीबाबत माहिती दिली.<br>• त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी महाप्रित यांनी दिलेली माहितीनुसार संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका यांना त्यांच्या क्षेत्रातील कांदळवनावरील भराव हटविण्याकरीता नियमोचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकपूर्वी सादर करावा व पुन्हा त्यांच्या क्षेत्रावर अतिक्रमण व भराव होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. | सर्व संबंधित आयुक्त, महानगरपालिका, संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित पोलीस अधिक्षक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • तसेच समितीमधील संबंधित पोलीस अधिक्षक यांना देखील त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधित पोलीस यंत्रणेस Highway Patrolling करुन कांदळवन क्षेत्रात कोणत्याही प्रकारे कांदळवनाची तोड, भराव व अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिला. | |
| 7 | पोलीस यंत्रणेमार्फत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत सद्यस्थिती व त्या गुन्ह्यामध्ये शिक्षा झालेल्या प्रकरणांबाबत आढावा. | • कांदळवन तक्रारी संबंधित प्रकरणांवर पोलीस यंत्रणेमार्फत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत समितीचे सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष यांच्या आदेशानुसार पोलीस यंत्रणेने केलेल्या कार्यवाहीबाबत एक तक्ता (प्रत संलग्न) तयार करण्यात आला मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्हा स्तरीय समितीमध्ये याबाबत उचित कार्यवाही करण्याच्या व सदर तक्ता हा समितीच्या सर्व संबंधित पोलीस यंत्रणेस अधिकारी उपलब्ध करुन त्यानुसार प्रत्येक महिन्यात माहिती भरुन सदर माहिती समितीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या. | संबंधित पोलीस यंत्रणा |
| 8 | **आयत्या वेळेचे विषय** | | |
| अ | कांदळवन तक्रारी संबंधित प्रकरणांवर गुन्हा दाखल (FIR) झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत. | कांदळवन तक्रारी संबंधित ज्या प्रकरणांवर खाजगी व्यक्ती / इतर संस्थाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रामध्ये अथवा कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटर बफर झोन क्षेत्रामध्ये निदर्शनास येणाऱ्या अनाधिकृत घटनांबाबत पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 अंतर्गत कारवाई करण्याच्या दृष्टीने सध्यस्थितीत भारत सरकारने आणलेल्या "जन विश्वास (दुरुस्ती) अधिनियम 2023" विधेयक हे पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 अंतर्गत "गुन्हेगारी शिक्षा कमी करून दंडात्मक शिक्षेमध्ये रूपांतर करण्यावर आधारित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.<br>त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी सदर विधेयकानुसार खाजगी कांदळवन व बफार झोन मध्ये होणाऱ्या अनियमिततेवर दंडात्मक धोरण निश्चित करण्याकरीता चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ठाणे, संचालक, पर्यावरण विभाग तथा सदस्य सचिव, MCZMA, महानगरपालिका, ठाणे, नवी मुंबई तसेच डॉ. महेश शिंदीकर, (तज्ञ सदस्य) यांची बैठक आयोजित करण्याच्या सूचना समितीचे सदस्य सचिव यांना दिल्या. | सर्व संबंधित जिल्हाधिकारी व कांदळवन कक्ष, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| ब | महानगरपालिका यांचे प्रतिनिधींना समितीच्या बैठकीत उपस्थितीबाबत राहण्याबाबत. | • कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या बैठकीत, संबंधित महानगरपालिका यांचे प्रतिनिधी वारंवार अनुपस्थित राहिल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. यामुळे संबंधित महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवन परिसरातील डेब्रिज तसेच अनधिकृत भराव हटविण्याच्या कार्यवाहीस विलंब होत असल्याचे समितीचे अशासकीय सदस्य यांनी निदर्शनास आणून दिले.<br>• या अनुषंगाने माननीय अध्यक्षांनी, समितीमध्ये समाविष्ट सर्व महानगरपालिकांच्या प्रतिनिधींना पुढील बैठकीस प्राधान्याने उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या. | सर्व संबंधित महानगरपालिका |

**(एस.व्ही. रामाराव, भा.व.से.)**
**सह अध्यक्ष**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती, तथा**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**( डॉ. विजय सुर्यवंशी, भा.प्र.से.)**
**अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग**